MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

■ वर्ष : १३ अंक : ४ पाने : १२ ■ जून-जुलै २०१९ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

*प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,*

मॉन्सूनची सुरूवात पाहणे खूपच आल्हाददायक आहे. हे उत्साहवर्धक वातावरण नक्कीच आपल्याला मोठी ऊर्जा आणि उत्साहाने कार्य करण्यास प्रोत्साहित करते.

कृषी अर्थव्यवस्थेचा विकास हा विद्युत क्षेत्राच्या कामगिरीशी निगडित आहे. त्याच्या वाढीस पाठिंबा देण्यासाठी आपले सर्वोत्तम योगदान देणे आपले मुख्य कर्तव्य आहे. यासंदर्भातील सुधारणांसाठी अजून सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. मला खात्री आहे की, आपण ते साध्य करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही.

- **देखभाल व दुरूस्ती करणे आवश्यक**
- **नावीन्यपूर्ण कल्पना, योजना राबवा**
- **टीमवर्कमध्ये एकवाक्यता हवी**
- **उद्दिष्ट ठेऊन काम करा**

नावीन्यपूर्ण कल्पना आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी व्यवस्थापन नेहमीच प्रोत्साहन देते. विविध माध्यमातून नावीन्यपूर्ण कल्पना आणि अंमलबजावणी केल्याने कंपनीची प्रतिमा उंचावते. अशाच एका अभिनव उपक्रमामुळे महापारेषणला 'कार्पोरेट एक्सलन्स' अंतर्गत 'डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावर मानाचा स्कॉच पुरस्कार मिळाला आहे. महापारेषणला मिळालेला हा सलग दुसरा स्कॉच पुरस्कार आहे, तंत्रज्ञान आणि कामगिरी सुधारणेच्या क्षेत्रातील नवीन कल्पना आणि सूचना आपण मांडल्या तर त्याचे स्वागत व्यवस्थापन नक्कीच करेल.

फोरम ऑफ रेग्युलेटरच्या SAMAST मार्गदर्शिकेनुसार महापारेषण ऑटोमॅटिक मीटर रिडींगची (AMR) प्रकल्पाची अंमलबजावणी करीत आहे. या प्रकल्पांतर्गत ६,६०० इंटरफेस एनर्जी मीटर (IEM) कार्यान्वित करणे आणि राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली येथे सर्व मीटरची माहिती गोळा करण्याकरिता मीटर डाटा ऍक्विजिझम सिस्टीम (MDAS) उभारणी व कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी नियोजित वेळेत व योग्य रितीने होण्यासाठी उपकेंद्र प्रमुखांना संपूर्ण प्रकल्पाची तांत्रिक माहिती देण्याकरिता कार्यशाळांचे आयोजन केलेले आहे.

कामगिरी सुधारण्याच्या प्रक्रियेत प्रशिक्षण हा एक चांगला उपक्रम आहे. यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये उपस्थिती असणे महत्त्वाचे आहे. मॉन्सून कालावधीचा उपयोग प्रशिक्षणाच्या उद्देशाने करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण विभागाने अगोदरच प्रशिक्षण आदेश जारी केले आहेत, जेणेकरून विविध विभागातील प्रमुख अधिकारी त्यानुसार कामावर आवश्यक मनुष्यबळ कार्यरत ठेवण्यासाठी नियोजन करू शकतात.

संचलन आणि पारेषण पद्धतीची देखभाल करणे मॉन्सून कालावधीत महत्त्वपूर्ण आहे. २२ मे २०१९ रोजी कळवा-पडघे आणि तळेगाव-खारघर मार्गाचे एकाचवेळी ट्रिपिंग कंडक्टर स्नॅपिंग आणि इन्सुलेटर खराब झाले होते. पॉवर इन्स्ट्रुमेंटस वारंवार खराब झाल्यामुळे शहरी आणि औद्योगिक क्षेत्रात भारनियमन होऊ शकते. जे अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी हानीकारक आहे, म्हणून पूर्वानुभव लक्षात घेऊन देखभाल आणि योग्य अंमलबजावणीसाठी परिश्रमपूर्वक नियोजन करणे आवश्यक आहे. समानता येण्यासाठी महापारेषणने मानक अग्निशमन धोरण तयार केले आहे. फायर पॉलिसीची योग्य अंमलबजावणी केल्यास नुकसान कमी होण्यास मदत होईल.



**पराग जैन नानोटिया (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत्येक कर्मचाऱ्याने योग्य नियोजन, समन्वय व टीमवर्क ठेवून प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. मागील अनुभवातून प्रकल्पाच्या अंमलबजावणीत आलेल्या अडचणी व अडथळे दूर करून नवीन प्रकल्प पूर्ण करण्याचा सचोटीने प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक कर्मचाऱ्याने कंपनीच्या 'लक्ष्यां'सह (Targets) आवश्यक कार्य केले पाहिजे.

चांगला संघप्रमुख नेहमीच एक ध्येय घेऊन संघाचे नेतृत्व करतो. मी आशा करतो की, कंपनीचा प्रत्येक अधिकारी त्यांच्या टीमचे नेतृत्व करताना निश्चितपणे गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करेल. अशक्य वाटणारं काम करण्याचं सामर्थ्य टीमवर्कमध्ये असते. चांद्रयान-२ चे नुकतेच यशस्वी लॉचिंग हे सुद्धा टीमवर्क आणि नेतृत्व यांचे उत्तम उदाहरण आहे. मला खात्री आहे की, प्रत्येक कर्मचारी भविष्यात यशाच्या मार्गाकडे जाण्यासाठी चांगले गुण आत्मसात करण्याचा नक्कीच प्रयत्न करेल.

**शुभेच्छांसह..!**

**– पराग जैन नानोटिया**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



■ ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रतिक्रिया ■

# समाजातील सर्व वर्गाला स्पर्श करणारे अंदाजपत्रक

■ *टीम महापारेषण, मुंबई*

देशातील शेतकरी, मध्यमवर्ग, गरीब, नोकरदार, व्यापारी आदींना आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीकडे नेणारे हे अंदाजपत्रक असून अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी अत्यंत दूरदृष्टी ठेवून ते सादर केले आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

ग्रामीण भारतातील तीन कोटी गावे डिजिटल साक्षर करून सर्व जगाशी ग्रामीण भागास जोडण्याचा प्रयत्न पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी केला आहे. पाच लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करून अर्थमंत्र्यांनी मध्यमवर्गीयांना, नोकरदारांना दिलासा दिला आहे. येत्या २०२३ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी योजना आणण्याचा प्रयत्न तसेच जोडधंदा म्हणून डेअरीच्या



उत्पन्नात वाढ करण्याची योजनाही शेतकऱ्यांना आर्थिक विकासाकडे घेऊन जाणारी आहे. नवीन शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणासाठी ४०० कोटींची तरतूद आतापर्यंत प्रथमच करण्यात आली.

शेतीच्या विकासासाठी खाजगी गुंतवणूक वाढवून शासनही गुंतवणूक करणार तसेच शून्य खर्चातील शेतीला प्रोत्साहन हा निर्णय स्वागतार्ह आहे. `नारी तू नारायणी' हा नवा नारा महिलांचा विकास साधणारा आहे.

सन २०२२ पर्यंत देशातील प्रत्येक कुटुंबाला वीज कनेक्शन देऊन गरिबांच्या घरातील अंधार नाहीसा होणार आहे. २०२१ पर्यंत १.९५ कोटी घरे बांधायचे लक्ष्य गरिबांच्या निवाऱ्याचा प्रश्न सोडविणारा निर्णय आहे. तसेच `हर घर जल' या योजनेतून समाजातील सर्वच वर्गातील लोकांना नळाव्दारे स्वच्छ पाणी पिण्यास उपलब्ध होणार आहे.

सौरऊर्जा निर्मितीत १० टक्के वाढ हा सौरऊर्जेला प्रोत्साहन देणारा निर्णय आहे. येत्या पाच वर्षात ८० हजार कोटींची सव्वा लाख कि.मी. चे रस्ते बांधून दळणवळण सुधारणार व देशाच्या प्रगतीचे रस्ते अधिक मजबूत होणार असल्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगून या अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.

## वर्धा जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी श्री. चंद्रशेखर बावनकुळे

राज्याचे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांची शासनाने नागपूरसह वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्ती केली आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने विविध जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली. त्या यादीत पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. श्री. बावनकुळे यांनी यापूर्वी भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून सक्षमपणे व यशस्वीरित्या जबाबदारी पार पाडली आहे.



***महापारेषण अपडेट***

६७४ अति उच्च दाब उपकेंद्रे कार्यान्वित





■ मुख्यमंत्र्यांनी केले विधानसभेत ऊर्जामंत्र्यांच्या कामाचे कौतुक ■

# राज्यात प्रथमच मोठ्या प्रमाणात कृषीपंपाना कनेक्शन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

विदर्भ-मराठवाड्यातील कृषीपंपाचा बॅकलॉग पूर्ण करणे, घारापुरी येथे ७० वर्षात प्रथमच वीज पोहोचवणे व गडचिरोली जिल्ह्यातील तुमीरकसा या शेवटच्या गावात ७० वर्षात वीज पोहोचवल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे विधानसभेत कौतुक करून अभिनंदन केले. अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस बोलत होते.

ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात विदर्भ-मराठवाड्यातील पाच लाखांपेक्षा अधिक कृषीपंपांना कनेक्शन देऊन बॅकलॉग दूर केला. राज्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात कृषीपंपाना कनेक्शन मिळाले.



मुंबईजवळील घारापुरी या बेटावर स्वातंत्र्याच्या ७० वर्षात प्रथमच वीज पोहोचवण्याचे काम झाले, असा उल्लेख मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केला. समुद्रात पाण्याच्या खालून आठ कि.मी. पर्यंत केबल टाकून घारापुरी येथे वीज पोहोचवली गेली. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या तुमीरकसा या शेवटच्या गावात वीज पोहोचवली, असा उल्लेखही मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केला. मंत्र्यांच्या कार्याचा उल्लेख होणारे ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे हे एकमेव मंत्री ठरले आहेत.



**महापारेषण अपडेट**

१,२८,१६५ एम.व्ही.ए. स्थापित क्षमता





**खारघर :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र संवसु विभाग, खारघरला भेट दिली. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. जगन्नाथ चुडे व अन्य अधिकारी.

## ■ खारघर येथील उपकरणांची कार्यपद्धती व वापराची घेतली माहिती ■

# व्यवस्थापकीय संचालकांनी दिली वाशी परिमंडळातील विविध ठिकाणी भेट

■ *टीम महापारेषण, वाशी*

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया (भा.प्र.से.) यांनी वाशी परिमंडळातील विविध ठिकाणी भेट दिली. या भेटीदरम्यान ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र संवसु विभाग, खारघर येथे विद्युत वाहिन्या व उपकेंद्रातील विविध चाचणी उपकरणांची कार्यपद्धती व वापर यांची माहिती घेतली.

रोहित्र, सीटीपीटी, बुशिंग आदी विद्युत उपकरणांमधील इन्सुलेटरची गुणवत्ता मोजणारे टॅन डेल्टा टेस्टिंग किट, रोहित्रांमधील ऑईलची गुणवत्ता व क्षमता मोजणारे बीडीव्ही, रोहित्रातील कोअर नाईडिंग आदींची यांत्रिक गुणवत्ता मोजणारे एसएसआरए किट, विद्युत वाहिन्या इन्सुलेटर स्ट्रिंग्सची गुणवत्ता मापणारे पीआयडी टेस्टिंग किट आदी चाचणी उपकरणांबाबतची पाहणी करण्यात आली. यावेळी वाशी परिमंडळातील अभियंत्यांनीही माहिती सादर केली.

याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. रवींद्र चव्हाण, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. जगन्नाथ चुडे उपस्थित होते



**वाशी :** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी वाशी परिमंडळातील विविध ठिकाणी भेट दिली. त्यांच्यासमवेत संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. मोतीसिंह चौहान, मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. जगन्नाथ चुडे, अधीक्षक अभियंता श्री. भूषण बल्लाळ व अन्य अधिकारी.

## थेट-भेट



**नालासोपारा :** येथील उपकेंद्रामध्ये पाहणी करताना महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे. शेजारी अधीक्षक अभियंता श्री. संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्री. महेश भागवत.

### ■ संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी केली उपकेंद्राची पाहणी ■

# नालासोपारा उपकेंद्रातील विद्युत पुरवठा सुरळीत

■ *टीम महापारेषण, मुंबई*

नालासोपारा येथील उपकेंद्रामध्ये १०० एम. व्ही. ए. चे रोहित्र क्र.१ मध्ये बिघाड झाल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. दरम्यान, वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी उपकेंद्राला भेट दिली.

महापारेषणच्या नालासोपारा उपकेंद्रामध्ये दि. ३० जून २०१९ रोजी पहाटे २ वाजून ५० मिनिटाला १०० एम. व्ही. ए. च्या रोहित्र क्रमांक एकमध्ये २२ के. व्ही. फिडर नं. ५ मध्ये बिघाड झाला होता. त्यामुळे १०० एम. व्ही. ए. चा वीजपुरवठा खंडित झाला. दरम्यान, विद्युतपुरवठा तत्काळ सुरू करण्यासाठी संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी त्वरित वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. जगन्नाथ चुडे यांना सूचना दिल्या. संबंधित यंत्रणेने युद्धपातळीवर नादुरूस्त झालेला रोहित्र बदलण्याची कार्यवाही केली. श्री. ताकसांडे यांनी वेळोवेळी परिस्थितीचा आढावा घेऊन उपकेंद्राची पाहणी केली.

## वाचाल तर वाचाल!

### ■ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुढाकार ■

# ऐरोलीत ग्रंथालयाचे थाटात उद्‌घाटन

■ *टीम महापारेषण, ऐरोली*

अति उच्च दाब स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडळ, ऐरोलीच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या ग्रंथालयाचे उद्घाटन अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

अधिकारी व कर्मचारी यांच्यात वाचनसंस्कृती वाढावी, या हेतूने सुरू करण्यात आलेल्या या ग्रंथालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुस्तके व ग्रंथ भेट स्वरूपात दिले आहेत. काही अधिकाऱ्यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त पुस्तके ग्रंथालयाला भेट दिली आहेत.

या कार्यक्रमाला अति उच्च दाब स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडळ, ऐरोलीचे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. मोहन ननावरे, पनवेलचे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. प्रकाश लिमकर, कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. संदीप वेंगुर्लेकर, व्यवस्थापक (मा.सं.) श्री. स्वप्नील साळुंखे, व्यवस्थापक (विवले) श्री. विलास बैरागी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**ऐरोली :** अति उच्च दाब स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडळ, ऐरोलीच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या ग्रंथालयाचे उद्घाटन करताना अधीक्षक अभियंता (स्थापत्य) सर्वश्री भूषण बल्लाळ. शेजारी मोहन ननावरे, प्रकाश लिमकर, संदीप वेंगुर्लेकर, स्वप्नील साळुंखे, विलास बैरागी यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी.



***महापारेषण अपडेट***

४७,४९६ स.कि.मी. अ.उ.दा. वाहिन्या






**नवी दिल्ली :** ५८ व्या स्कॉच पुरस्कारामध्ये महापारेषणतर्फे पुरस्कार स्वीकारताना महापारेषणचे अधीक्षक अभियंता श्री. नासीर कादरी. डावीकडून उपकार्यकारी अभियंता श्री. अजय नारखेडे, स्कॉच डेव्हलपमेंट फौंडेशनचे श्री. निर्मल बन्सल, फौंडेशनचे संचालक (सार्वजनिक धोरण) श्री. रोहन कौच्चर, सहाय्यक अभियंता कु. प्रग्या मिश्रा, स्कॉच ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. गुर्शरंग धांजल, श्री. कादरी, स्कॉच ग्रुपचे अध्यक्ष श्री. समीर कोच्चर, श्री. व्ही. एन. आलोक, कार्यकारी अभियंता श्री. अनिल महिंद्रकर, सहाय्यक अभियंता श्रीमती स्मिता शिंदे.

### ■ सलग दुसरा स्कॉच पुरस्कार; दिल्लीत थाटात वितरण ■

# डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरासाठी महापारेषणला सुवर्ण पारितोषिक

■ ***टीम महापारेषण, मुंबई***

नवी दिल्ली येथे झालेल्या ५८ व्या स्कॉच पुरस्कारामध्ये `कार्पोरेट एक्सलन्स` अंतर्गत `डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर` यासाठी महापारेषणला सुवर्ण पारितोषिक देण्यात आले. महापारेषणच्या वतीने अधीक्षक अभियंता श्री. नासीर कादरी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. महापारेषणला मिळालेला हा सलग दुसरा स्कॉच पुरस्कार आहे.

स्कॉच ग्रुपच्या वतीने दरवर्षी शासन, अर्थ, बँकिंग, तंत्रज्ञान, सांघिक नागरिकत्व, आर्थिक या क्षेत्रातील वाढीसाठी हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी `मोदी नॉमिक्स २.०-मॅक्रोइकॉनॉमिक अजेंडा` अशी मूळ थीम होती. महापारेषण वतीने नामांकन भरून सदर पुरस्कार गुणांकन पद्धतीने मिळविला आहे. याप्रसंगी स्कॉच ग्रुपच्या तज्ज्ञांसमोर महापारेषणचे अधीक्षक अभियंता श्री. नासीर कादरी यांनी जळगावच्या २२० के. व्ही. केकतनिंबोरा उपकेंद्राचे सादरीकरण केले. यावेळी कार्यकारी अभियंता (स्वयंचलन, चाचणी व नवसंकल्पना) श्री. अनिल महिंद्रकर, नाशिकचे उपकार्यकारी अभियंता (प्रकल्प) श्री. अजय नारखेडे, नाशिकच्या सहाय्यक अभियंता (चाचणी) श्रीमती स्मिता शिंदे, सांघिक कार्यालयाच्या सहाय्यक अभियंता (प्रकल्प) कु. प्रग्या मिश्रा उपस्थित होते. २२० के. व्ही. केकतनिंबोरा डिजिटल उपकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी नाशिक परिमंडळातील सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. मुख्य अभियंता श्री. जयंत वीके यांनी सर्वांचे अभिनंदन केले.



***महापारेषण अपडेट***

७६५ के. व्ही. एकतुनी (जि. औरंगाबाद) उपकेंद्र



## सर्वांसाठी वीज



**वाई :** १३२/३३ के. व्ही. वाई उपकेंद्रातील २५ एम.व्ही.ए. रोहित्र कार्यान्वित करण्यात आले. त्याप्रसंगी उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

### ■ महाबळेश्वर, पाचगणी परिसरात योग्य दाबाने वीजपुरवठा होणार ■

# वाई येथील उपकेंद्रामध्ये रोहित्र कार्यान्वित

■ *टीम महापारेषण, कराड*

सातारा जिल्ह्यामध्ये वाई येथे १३२ के. व्ही. उपकेंद्रामध्ये १३२/३३ के. व्ही. २५ एम. व्ही. ए. (अतिरिक्त) रोहित्र कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे महाबळेश्वर, पाचगणी परिसरातील गावांना योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

वाई उपकेंद्रात १३२/३३ के. व्ही. चे एकच रोहित्र उपलब्ध असल्याने वीजपुरवठा अविरत ठेवण्यासाठी अतिरिक्त रोहित्राची आवश्यकता होती. वाई येथील उपकेंद्रामध्ये अतिरिक्त रोहित्र बसविल्याने भविष्यात पर्यटन स्थळासाठी प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वर, पाचगणी या परिसरात योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.

याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. विकास बढे, अधीक्षक अभियंता श्रीमती छाया साळे, अधीक्षक अभियंता श्री. रंगनाथ चव्हाण, कार्यकारी अभियंता श्री. विजयानंद सोरटे, कार्यकारी अभियंता श्री. अशोक ढापरे, उपकेंद्र प्रमुख श्री. नागसेन रोडगे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काव्याचा आविष्कार

### ■ तरल अनुभूती देणाऱ्या आशयसंपन्न कविता ■

# `कविता...संदर्भ असलेल्या` या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

येथील सांघिक कार्यालयात कार्यरत असणारे कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर यांच्या `कविता...संदर्भ असलेल्या` या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नुकतेच थाटात झाले.

या काव्यसंग्रहात आठवणी, महिला, प्रवास आणि महामानव यावर आधारित कविता आहेत. आशयसंपन्न काव्याचा आविष्कार असणाऱ्या या कविता तरल अनुभूती देणाऱ्या आहेत.

यापूर्वी श्री. पेटकर यांची `कल्याण`, `चांगुलपणा अवतीभवती`, `कविता मनातल्या`, `इंद्रधनुष्य`, ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. वाशी विभागात कार्यरत असताना त्यांच्या उपकेंद्राला सतत तीन वेळा उत्कृष्ट उपकेंद्राचा पुरस्कार मिळाला आहे. तसेच महाऊर्जा विभागांतर्गत वीजबचतीसाठी केलेल्या विशेष कामासाठीही त्यांचा ऊर्जामंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला होता.



**मुंबई :** महापारेषणचे कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर यांच्या `कविता...संदर्भ असलेल्या` या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना डावीकडून श्रीमती योगिता मोरे, श्री. सुदेश हिंगलासपूरकर, श्री. पेटकर, श्री. सतीश भावसार, श्री. अनिरुद्ध गद्रे.

भाव-राग-ताल


पियूषा प्रशांत जोशी

■ तमिळनाडूमध्ये दहा हजार भरतनाट्यम कलाकारांनी केले नटेश कौत्वम ■

# गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदविला पियूषा जोशीने सहभाग

■ *टीम महापारेषण, मुंबई*

चिदंबरम (तमिळनाडू) येथील नटराज मंदिरात तब्बल दहा हजार भरतनाट्यम कलाकारांनी नटेश कौत्वम सादर केले. हा कार्यक्रम गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदविला गेला. यामध्ये पियूषा प्रशांत जोशी हिनेही सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमात नृत्यकला निकेतन, मुंबई येथील ७७ विद्यार्थीनींनी भरतनाट्यम सादर केले. त्यांना श्रीमती अर्चना पालेकर व श्रीमती मयुरी खरात यांचे मार्गदर्शन लाभले.

पियूषा जोशी ही आठ वर्षापासून भरतनाट्यमचे शिक्षण घेत असून तिने ज्युनिअर विशारद ही पदवी संपादन केली आहे. महापारेषणच्या सांघिक कार्यालयातील उपव्यवस्थापक (विवले) श्री. प्रशांत महेंद्र जोशी यांच्या त्या कन्या आहेत.

अभिनंदन



## बारावीच्या परीक्षेत रितेश येवलेचे यश

■ *टीम महापारेषण, नाशिक*

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी घेतलेल्या बारावीच्या शालांत परीक्षेत रितेश उदय येवले याने ८७.६९ टक्के गुण संपादन केले.

जेईई ऍडव्हान्स-२०१९ या आय.आय.टी. साठीच्या प्रवेश परीक्षेत रितेशने अखिल भारतीय स्तरावर १,६२४ वा रँक मिळविला आहे. आय.आय.टी.मुंबई येथे बी.टेक (केमिकल्स) इंजिनिअरिंगसाठी त्याला प्रवेश मिळाला आहे. अति उच्च दाब प्रकल्प परिमंडळ, नाशिक येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. उदय भालचंद्र येवले यांचा रितेश हा सुपुत्र आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## दहावीच्या परीक्षेत गार्गी लोहरे हिचे यश

■ *टीम महापारेषण, नागपूर*

सी.बी.एस.ई. बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत कु. गार्गी लोहरे हिने ९६.६० टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे. महापारेषणच्या नागपूर परिमंडळातील चंद्रपूर येथे अतिरिक्त कार्यकारी अभियंता (प्रकल्प) पदावर कार्यरत असलेले श्री. लीलाधर लोहरे व महावितरण कंपनीच्या गोंदिया परिमंडळात प्रणाली विश्लेषक पदावर कार्यरत असलेल्या सौ. समिधा लोहरे यांची ती मुलगी आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



***महापारेषण अपडेट***

५०० के. व्ही. व्दिष्टधारा एच.व्ही.डी.सी. उपकेंद्र





**अकोला :** अमरावती परिमंडळांतर्गत ज्ञानप्रकाश प्रशिक्षण केंद्र अकोला येथे महिला सक्षमीकरणावर आधारित ऊर्जा प्रशिक्षण घेण्यात आले. याप्रसंगी प्रशिक्षणार्थ्यांसोबत अधिकारी.

■ महिला अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# महिला सक्षमीकरणावर आधारित अकोल्यात ऊर्जा प्रशिक्षण

■ *टीम महापारेषण, अकोला*

अमरावती परिमंडळांतर्गत ज्ञानप्रकाश प्रशिक्षण केंद्र अकोला येथे महिला सक्षमीकरणावर आधारित ऊर्जा प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच Safety Training व Refresher Training प्रशिक्षणही घेण्यात आले.

ऊर्जा प्रशिक्षणादरम्यान अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री बी. टी. राऊत यांनी प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. याप्रसंगी अधीक्षक अभियंता संवसु मंडळ अकोला येथील श्री. सुधीर ढवळे, चाचणी व दूरसंचार मंडळ अकोला येथील अधीक्षक अभियंता तथा प्रशिक्षण केंद्रप्रमुख श्री. प्रवीण देशमुख, ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग अकोला येथील कार्यकारी अभियंता तथा प्रशिक्षण केंद्राचे उपप्रमुख श्री. गजानन कोल्हे, संवसु विभाग अकोला येथील कार्यकारी अभियंता श्री. अंबादास जाधव, प्रकल्प विभाग अकोला येथील कार्यकारी अभियंता श्री. गणेश देशमुख उपस्थित होते.

प्रशिक्षण शिबिरासाठी श्रीमती भाग्यश्री घोसाळकर, सोनाली थिटे, चाचणी व दूरसंचार मंडळ अकोल्याचे अधीक्षक अभियंता तथा केंद्रप्रमुख श्री. प्रवीण देशमुख, ४०० के. व्ही. ग्रहण केंद्र विभाग अकोल्याचे कार्यकारी अभियंता तथा प्रशिक्षण केंद्र उपप्रमुख श्री. गजानन कोल्हे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. नितीन कांबळे यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण केंद्राच्या समन्विका श्रीमती चारुलता काळे यांनी शिबिराचे व्यवस्थापन केले.

■ सीटी, पीटी, देखभाल विषयावर प्रशिक्षण ■

# नागपूर व चंद्रपूरमध्ये अभियंत्यांसाठी कार्यशाळा



**नागपूर :** ज्ञानदीप प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर व नागपूर परिमंडळाच्या वतीने संचलन व सुव्यवस्था विभागामध्ये कार्यरत उपकेंद्र अभियंत्यासाठी आयोजिलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेत उपस्थित प्रशिक्षणार्थी.

■ *टीम महापारेषण, नागपूर*

ज्ञानदीप प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर व नागपूर परिमंडळाच्या वतीने संचलन व सुव्यवस्था विभागामध्ये कार्यरत उपकेंद्र अभियंत्यांसाठी सीटी, पीटी देखभाल या विषयावर नागपूर व चंद्रपूर येथे कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाला अधीक्षक अभियंता श्री. सतीश अणे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश सावंत, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. जयंत कोकाटे, मार्गदर्शक श्री. अजयकुमार मुजुमदार उपस्थित होते.

प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी मुख्य अभियंता श्री. सुरेशकुमार पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश सावंत, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. जयंत कोकाटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले.




**पडघे :** येथे महिलांसाठी आयोजिलेल्या ऊर्जा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शीतल गेडाम. शेजारी अन्य कर्मचारी वर्ग.

### ■ महिला सक्षमीकरणावर भर ■

# पडघे येथे महिलांसाठी ऊर्जा प्रशिक्षण

■ *टीम महापारेषण, वाशी.*

महापारेषण कंपनीच्या प्रशिक्षण धोरणांतर्गत महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने ऊर्जा हा प्रशिक्षण कार्यक्रम प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, पडघा येथे घेण्यात आला.

प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी केंद्राचे प्रमुख तथा उच्चदाब दिष्टधारा ग्रहण केंद्र संचलन व सुव्यवस्था मंडळ, पडघेचे अधीक्षक अभियंता श्री. संदीप कलंत्री, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शीतल गेडाम आणि प्रशिक्षण केंद्र पडघा मंडळ कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

प्रशिक्षणामुळे महिला कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढण्यास तसेच व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मोलाची मदत होईल, असा अभिप्राय प्रशिक्षणार्थ्यांनी दिला.


## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे जून-जुलै २०१९

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. श्रीकांत सदाशिव राजूरकर | कार्यकारी संचालक (पारेषण) | सांघिक कार्यालय | १९.०७.२०१९ |


### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | सुरेशकुमार जयकृष्ण पाटील | मुख्य अभियंता | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर | ३०.०६.२०१९ |
| २. | अविनाश मधुकर कोंडावार | मुख्य अभियंता | औरंगाबाद | ३०.०६.२०१९ |
| ३. | रूपेश नारायणराव फरकाडे | अधीक्षक अभियंता | दूरसंचार व चाचणी मंडळ, अकोला | ३०.०६.२०१९ |
| ४. | नरेशकुमार सहदेवराव तेलतुंबडे | मुख्य अभियंता | सांघिक कार्यालय | ३१.०७.२०१९ |
| ५. | वसंत दिनकरराव पांडे | अधीक्षक अभियंता | राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली | ३१.०७.२०१९ |



***महापारेषण अपडेट***

यावर्षी पारेषण हानी ३.११ टक्के



पाहणी दौरा

■ जिल्हाधिकारी श्री. राजेश नार्वेकर यांनी केले मार्गदर्शन ■

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी केली अंजूर उपकेंद्राची पाहणी



**भिवंडी (जि.ठाणे) :** येथील अंजूर गावातील महापारेषण कंपनीच्या Electrode Substation ची पाहणी करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया, जिल्हाधिकारी श्री. राजेश नार्वेकर, संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण व अन्य अधिकारी वर्ग.

■ *टीम महापारेषण, ठाणे*

अंजूर (ता. भिवंडी) येथील महापारेषण कंपनीच्या Electrode Substation ची महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया व ठाण्याचे जिल्हाधिकारी श्री. राजेश नार्वेकर यांनी पाहणी करून मार्गदर्शन केले.

महापारेषण कंपनीचे अंजूर येथील Electrode Substation इतरत्र स्थलांतरित करून नॅशनल हाईस्पीड रेल कार्पोरेशन लिमिटेडचे लोकोयार्ड सामावून घेण्याबाबतची व्यवहार्यता तपासण्याच्या हेतूने ही पाहणी करण्यात आली.

यावेळी संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, मुख्य अभियंता (स्थापत्य) मोतीसिंह चौहान, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) जे. डी. चुडे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे तांत्रिक सल्लागार तथा अधीक्षक अभियंता सुनील सूर्यवंशी, पडघे मंडळाचे अधीक्षक अभियंता संदीप कलंत्री, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) (ऐरोली) भूषण बल्लाळ, पनवेलचे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) प्रकाश लिमकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) चैतन्य जाधव उपस्थित होते.

Review Meeting



**कराड :** अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ कराड येथे कामकाजासंदर्भात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. याप्रसंगी वरिष्ठ अधिकारी वर्ग.



**कराड :** अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ कराड येथे कामकाजासंदर्भात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी पाहणी केली. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण व अन्य अधिकारी वर्ग.

■ तांत्रिक, विवले व मा.सं.विभागाबाबत सविस्तर चर्चा ■

# महापारेषणच्या कामकाजासंदर्भात कराडमध्ये आढावा बैठक

■ *टीम महापारेषण, कराड*

अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ कराड येथे महापारेषणच्या कामकाजासंदर्भात वित्त व लेखा, तांत्रिक व मानव संसाधन विभागाबाबत आढावा बैठक घेण्यात आली. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ कराड कार्यालयाचे कार्यक्षेत्र सातारा, कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यामध्ये आहे. यामध्ये चालू असलेल्या प्रकल्पांच्या कामकाजाबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीमध्ये मा. सं. विभागाच्या अनुषंगाने रिक्तपदाचा आढावा घेताना परिमंडळातील सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) यांना गुजरात व तेलंगणा या राज्यातील विद्युत क्षेत्रातील आकृतीबंध व कामाचे स्वरूप याबाबतची माहिती अवगत करण्याविषयी सूचित करण्यात आले.

महानिर्मितीकडून महापारेषणकडे जनरेटिंग स्वीचयार्ड हस्तांतरण संदर्भात महानिर्मिती पोफळी येथे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कराड परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. विकास बढे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे तांत्रिक सल्लागार तथा अधीक्षक अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता श्री. अरविंद डडमल, अधीक्षक अभियंता श्रीमती छाया साळे, अधीक्षक अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) (प्रभारी) श्री. सुनील माने, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. अशोक ढापरे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

From the Desk of ED, HR

# घेण्यापेक्षा देण्याचा आनंद अवर्णनीय

मानव हा सामाजिक प्राणी आहे, असे म्हटले जाते. समाजाशिवाय तो राहू शकत नाही. समाजात जीवन जगताना आपले एकमेकांशी नेहमी देणे-घेणे सुरू असते; किंबहूना ती प्रक्रिया निरंतर चालू राहणारीच आहे. कधी आपल्या गरजेकरिता तर कधी भविष्यातील तरतुदीकरिता ही प्रक्रिया प्रदीर्घ काळ चालू राहते. त्यात चुकीचे किंवा वावगे असे काही नाही, किंबहूना हेच खरे सत्य आहे.

समाजात असेही काही लोक आहेत की, ते घेण्यापेक्षा देण्यामध्ये आनंद बाळगतात. असेही नाही की, आपण काही देत नाही; आपणही देतो, पण आपल्या देण्याला मर्यादा असतात. जे लोक अमर्याद देतात किंवा घेण्यापेक्षा त्यांना देण्यामध्ये जास्त आनंद मिळतो, असे लोक महान असतात.

घेण्यामध्ये जो आनंद आहे त्याच्या अनेकपट आनंद देण्यामध्ये आहे. ''जे- जे आपणासी ठावे, ते-ते इतरांसी सांगावे। शहाणे करुन सोडावे, सकळजन।'' अशी विचारसरणी असणारे अनेकजण आपल्याला समाजात बघायला मिळतात. फक्त ज्ञान, मार्गदर्शन एवढेच देता येते असे नाही; तर देण्याकरिता अनेक गोष्टी आहेत. भौतिक स्वरूपात किंवा अभौतिक स्वरूपात. अगदी छोट्या गोष्टींपासून ते महासागराएवढे देता येणे शक्य आहे. त्यासाठी मात्र, आपले मन विशाल असले पाहिजे. देणे म्हणजेच समान अर्थाने मदत करणे होऊ शकते. आपण जेव्हा एखाद्याला देतो तेव्हा त्याला ते देणे मदत स्वरूपात उपयोगी पडावे, यासाठी आपण देत असतो. काहीही अपेक्षा न बाळगता देत राहणे हा सुद्धा त्याच्या पुढचा टप्पा आहे. मात्र, हे करीत असताना त्या घेणाऱ्या व्यक्तीमध्ये तेवढेच दातृत्व असणे गरजेचे असते. नाही तर ते देणे सत्कार्मी न लागता ते निरुपयोगी ठरेल. एखाद्याला पूर्ण अंत:करणाने आपण दिले तर त्या देण्याला अर्थ असतो. मग त्यातून मिळणारा आनंद काही औरच असतो.

भुकेल्याला अन्न देताना, तहानलेल्यांना पाणी देताना, एखाद्याला निवाऱ्यासाठी घर देताना, निर्वस्त्रांना कपडे देताना, बेरोजगारांना रोजगार देताना, गोरगरिबांना संरक्षण देताना, जनावरांचे, वसुंधरेचे रक्षण करताना, वृद्ध माता-पित्यांचे पालनपोषण करताना, मुलांना घडविताना, तरूणांना दिशा देताना, देशाकरिता श्रमदान, बलिदान देताना...अशा अनेक क्षेत्रामध्ये आपण देण्याकरिता हातभार लावू शकतो. सरतेशेवटी आपण समाजासाठी काय देऊ शकतो, याचा विचार आपण केला पाहिजे.

देण्याची प्रक्रिया निरंतर आहे, म्हणूनच मानवी जीवन टिकून आहे. आता त्याचे रूपांतर आधुनिक युगात होत आहे. समाजामध्ये प्रत्येक स्तरामध्ये प्रगती होत आहे. त्याचं काहीसं श्रेय ''Art of Giving'' या तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवण्याच्या लोकांना जाते.

इतर प्राण्यांपेक्षा मानव वेगळा आहे, त्याची स्वतंत्र विचार करण्याची क्षमता आहे. त्यामुळे जंगलराज आटोक्यात राहून आज जगात सद्भावना जागृत आहे. प्रत्येक जण आपल्या परीने या देण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतो. त्यासाठी दातृत्व आपल्या अंगी असणे गरजेचे आहे. निस्वार्थ भावनेने एखाद्याला देण्यात जो आनंद आहे, तो अवर्णनीय आहे. कुणाचे ओझे हलके करण्यामध्ये एक वेगळाच आनंद आहे. कोणाचे अश्रु पुसण्यामध्ये तोच आनंद दडला आहे. जर आपण सर्वजण ''Art of Giving'' या तत्त्वज्ञानांवर विश्वास ठेऊन आपण एखाद्याला मदत केली तर हे जग एक आनंदानं बहरलेलं नंदनवन होऊ शकतं. आज




कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांकरिता आपण काही तरी देणे लागतो. सर्वांनी यामध्ये हातभार लावला तर शासन व इतर संस्थांवरचा भार कमी करण्यास आपण मदत करू शकतो. जर परमेश्वराने आपल्याला एवढे काही दिले व आपण जर आपल्याकडील थोडेफार दिले तर बराच सकारात्मक बदल होऊ शकतो, यात शंका नाही.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**


संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.